MHCO090001402018	दावा क्र.१२०/२०१८ दिपक चव्हाण --- वादी विरुध्द निर्माण रेसीडेन्सी को–ऑप हौसिंग सो. --- प्रतिवादी

दावा क्रमांक १२०/२०१८ मधील निशाणी क्र.४५ वर आदेश
(दिनांक २४/०६/२०२६)

१. सदरील अर्ज हा वादी यांनी महाराष्ट्र सहकार कायदा कलम ९५ व सी.पी.सी आदेश ३९ नियम १ व २ अंतर्गत तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणे कामी दाखल केला आहे.

२. वादी यांचे अर्जातील कथन की, वादी यांनी मुळ दावा हा प्रतिवादी विरुध्द हक्कज्ञापन व निरंतर मनाई हुकूम मिळणे कामी दाखल केला आहे. मूळ दाव्याचा विषय हा प्रतिवादी अगर त्यांच्या तर्फे ति–हाईत इसमांनी वादींच्या प्रतिवादी क्र.१ संस्थेतील मालकी व कब्जेवहीवाटीच्या फ्लॅट क्र.ए/एस–१ मधील मालकी हक्काच्या कब्जेवहीवाटीला हरकत अडथळा करु नये म्हणून कायम मनाई हुकूम मिळणे कामी दावा दाखल केला आहे.

३. दावा मिळकत ही मौजे सावंतवाडी, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग परिसरातील सी.स.नं.१६७५ (स.नं.१२३ पैकी) निर्माण रेसिडेन्सी कॉ.ऑप. हौसिंग सो. मर्या., प्लॉट क्र.ए/एस–१ क्षेत्र ६३.२६ ही फ्लॅट मिळकत आहे. प्रतिवादी ही

महाराष्ट्र सहकार कायदया खाली नोंदविलेली सहकारी संस्था असून वादी हे तिचे सभासद आहेत. प्रतिवादी क्र.२ हे प्रतिवादी क्र.१ संस्थेचे सचिव असून प्रतिवादी क्र.३ हया संस्थेच्या ट्रेझरर आहेत. संस्थेची मूळ इमारतीची जमीन ही समीर नार्वेकर यांच्या मालकीची होती. त्यांच्या पुर्वहक्कदारांनी मुंबई येथील बिल्डर यांना ती जमीन विकसनासाठी दिली होती. समीर नार्वेकर यांनी प्रत्यक्षात विकसनाची कामे केली आहेत. त्यानुसार नोंदणिकृत खरेदीकरारपत्र देखील सन २००४ साली करुन दिले आहे. तसेच अर्पाटमेंट चे काम पुर्ण झाल्यानंतर सन २००६ मध्ये फ्लॅट धारकांना कब्जे देखील दिले आहे. त्यानंतर फ्लॅट धारकांनी फ्लॅटची डिड ऑफ अर्पाटमेंट करुन देण्याबाबत नार्वेकर यांना वेळोवेळी कळविले परंतु त्यांनी करुन न दिल्यामुळे सन २०१४ साली दैनंदिन व्यवस्थापनासाठी प्रतिवादी संस्थेची स्थापना करण्याची फ्लॅट धारकांनी एकमताने ठरविले. सदरील अर्पाटमेंट मध्ये एकूण २० फ्लॅट आहेत परंतु प्रत्यक्षात वादी, प्रतिवादी क्र.१ संस्थेचे सचिव, प्रतिवादी क्र.२ ट्रेझरर, प्रतिवादी क्र.३ व संस्थेचे अध्यक्ष असणारे श्री.केनी यांची बहीण असे फक्त चारच फ्लॅट धारक त्याठिकाणी कायम राहण्यास आहेत. उर्वरीत सर्वजण मुंबई तसेच इतर ठिकाणी वास्तव्यास आहेत. त्यामुळे वादींची प्रतिवादी क्र.१ संस्थेच्या मुख्य प्रर्वतक पदी एकमताने निवड झालेली आहे. त्यानुसार वादींनी प्रतिवादी क्र.१ संस्था स्थापन करण्याचे कार्य पार पाडले आहे. संस्था अस्तीत्वात आल्यानंतर संस्थेच्या

पोटनियमानुसार व तरतुदीनुसार दप्तर सांभळण्याची जबाबदारी ही सचिव म्हणून प्रतिवादी क्र.२ यांनी जबाबदारी होती व आर्थिक व्यवहार सांभाळण्याची जबाबदारी ट्रेझरर या नात्याने प्रतिवादी क्र.३ यांची जबाबदारी होती. त्यानुसार त्यांनी त्यांची जबाबदारी पार पाडली आहे. त्यानंतर वादी यांनी संस्थेचे अध्यक्ष या नात्याने समीर नार्वेकर व विकसक मे.दिनेश असोशिएटस यांच्याकडे सर्व फ्लॅट धारकांचे डिड ऑफ अपार्टमेंट करुन देण्याबाबत तगादा लावला. परंतु समिर नार्वेकर यांनी प्रतिवादी क्र.२ व ३ यांना हाताशी धरुन असंख्य गैरकृती सुरु केल्या आहेत. तसेच समीर नार्वेकर यांनी प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्याशी संगनमत करुन वेगवेगळे खोटे कागद व प्रोसिडींग तयार करुन आणी त्याआधारे वैयक्तीक व्देषातुन वादींचे सभासदत्व रद्द केले आहे.

४. वादी यांच्या अर्जातील पुढील कथन की, प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी त्यांच्या पदाचे संस्थेकडे राजिनामे दिल्याचे नाटक केले आहे आणि संस्थेवर अवसायकाची नेमणुक देखील करुन घेतली आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ संस्थेचे आर्थिक व्यवहार बंद पाडुन वादींना अध्यक्ष पदावरुन हटविले आहे. वादी यांना संस्थेच्या कोणत्याही दप्तराची अथवा हिशोबाची सन २०१५ सालापर्यंत माहिती नव्हती. त्याबाबत सर्व माहिती ही प्रतिवादी क्र.२ व ३ यांना होती व आहे. परंतु त्यांनी ती माहिती वादींना आजतागायत दिलेली नाही. वादींनी प्रतिवादींच्या कामाबाबत शंका निर्माण झाल्याने त्यांनी प्रतिवादी संस्थेचे लेखापरिक्षण प्रमाणीत

लेखापरिक्षक रविंद्र निबरे यांच्या कडून करुन घेण्याचे ठरविले. परंतु प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी इतर फ्लॅट धारकांना वादींच्या विरुध्द खोटे सांगुन त्यांची दिशाभूल केली आहे. आणि त्यानुसार वादींना दिनांक २४/१०/२०१७ रोजी ॲड.संदिप निंबाळकर यांच्या मार्फत वादींचे सभासदत्व रद्द करण्याची नोटीस देण्यात आली आहे. त्यानुसार प्रतिवादी संस्थेच्या दिनांक १९/०१/२०१८ रोजी च्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये वादींचे सभासदत्व रद्द केल्याचे दाखविले आहे. मा.सहायक निबंधक, सहकारी संस्था, सावंतवाडी, यांनी देखील दिनांक २१/०३/२०१८ रोजी आदेश करुन वादींचे सभासदत्व रद्द केले आहे. त्या आदेशा विरुध्द वादी यांनी मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण भवन, मुंबई यांच्याकडे अपिल दाखल करुन ते अपिल दिनांक १०/०६/२०२० रोजी मंजुर करण्यात आले. त्यानंतर प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी संस्थेच्या वतीने वादींना फ्लॅटचा कब्जा हस्तांतरीत करण्यात यावा अशी बेकायदेशीर नोटीस पाठविली. त्यास वादींनी दिनांक २५/०४/२०१८ रोजी योग्य उत्तर दिले आहे. त्यानंतर देखील प्रतिवादी क्र.१ तर्फे वादींना दिनांक १८/०४/२०१८ रोजी रक्कम रु.१,२३,८३७/- इतक्या रकमेची मागणी करणारी नोटीस देण्यात आली. त्या नोटीसला देखील वादींनी दिनांक ०६/११/२०१८ रोजी उत्तर दिले आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी प्रतिवादी क्र.१ तर्फे सहायक निबंधक, सावंतवाडी यांना दिनांक ०८/०३/२०१९ रोजी पत्र देऊन वादींकडून

काही त्रुटी पुर्ण करण्याची मागणी केली होती. त्यानुसार वादींनी दिनांक ०९/०३/२०१९ रोजी खुलासा व उत्तर दिले आहे. तसेच वादींनी प्रतिवादी क्र.१ संस्था व सचिव यांना दिनांक ०७/०३/२०१९ रोजी पत्र देऊन वादी हे प्रतिवादी संस्थेचे काहीही देणे लागत नसल्याबाबत खुलासा केला आहे. त्यानंतर प्रतिवादींनी कलम १०१ अन्वये मा.सहायक निबंधक, सहकारी संस्था, सावंतवाडी यांच्याकडे कथित रकमेच्या वसुलीपोटी अर्ज दाखल केला. तो अर्ज अंशत: मंजुर करुन वादींना रक्कम रु.१५,०५०/– भरणा करण्याबाबत आदेश करण्यात आला त्यानुसार वादींनी ती रक्कम प्रतिवादी संस्थेकडे भरणा केली आहे. परंतु त्या आदेशा विरुध्द प्रतिवादींनी मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण भवण मुंबई यांच्याकडे रिव्हीजण दाखल केले ते रिव्हीजण देखील दिनांक ३०/०५/२०२५ रोजी नामंजुर करण्यात आले.

५. वादी यांचे अर्जातील पुढील कथन की, वादी यांनी यापुर्वी निशाणी ५ अंतर्गत तुर्तातुर्त मनाई अर्ज दाखल करुन प्रतिवादींनी वादींच्या दावा मिळकती मध्ये हरकत अडथळा करु नये म्हणून मागणी केली होती. त्या अर्जावर दिनांक १५/०४/२०१९ रोजी सुनावणी पुर्ण होऊन अर्ज आदेशाकरिता ठेवण्यात आला होता. परंतु कोविड–१९ च्या कालावधीमध्ये टाळेबंदी असल्याकारणामुळे निशाणी ५ वर आदेश पारित करण्यात आला नाही. तसेच प्रतिवादी यांनी दिनांक ०१/१२/२०२१ रोजी निशाणी

३६ ला वादींच्या दावा मिळकतीमधील शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी हरकत अडथळा करणार नाहीत अशी पुरसीस देखील दाखल केली होती. त्यानुसार निशाणी ५ वरील अर्ज देखील निकाली काढण्यात आला होता. परंतु असे असून देखील प्रतिवादी यांनी सन २०२५ सालापासून वादींना विविध प्रकारच्या नोटीसा पाठवुन वादींकडून अवास्तव व अवाजवी रकमांची मागणी सुरु केली आहे. त्यानुसार प्रतिवादी हे वादींना त्रास देत आहेत. तसेच प्रतिवादींनी अचानकपणे दिनांक २२/०१/२०२६ रोजी वादींना कोणतीही नोटीस न देता ते कायदेशीरपणे दावा मिळकतीचे पाणी कनेकशन व ड्रेनेज कनेकशन तोडुन टाकले आहे. परंतु प्रतिवादींना प्रत्यक्षात असा कोणताही हक्क व अधिकार नाही. प्रतिवादींनी एकप्रकारे वादींच्या जगण्याच्या मूलभूत हक्कावर गदा आणली आहे. त्यानुसार वादींनी दिनांक २५/०१/२०२६ रोजी सावंतवाडी पोलीस स्टेशन येथे तक्रार देखील दाखल केली. परंतु पोलिसांनी सदरील वाद हा दिवाणी स्वरुपाचा असून तक्रारीची दखल घेण्यास नकार दिला. त्यामुळे वादींना सदरील अर्ज दाखल करणे भाग पडले. त्यामुळे प्रतिवादींनी वादींच्या दावा मिळकतीमधील पाणी कनेक्शन व ड्रेनेज कनेक्शन जोडून पुर्ववत करुन दयावे. तसेच दाव्याचा अंतिम निकाल लागे पर्यंत प्रतिवादी अगर त्यांच्या तर्फे ति-हाईत इसमांनी दावा मिळकतीमधील शांततामय कब्जेवहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करुन नये म्हणून तुर्तातुर्त मनाई देण्यात यावी तसेच दावा मिळकतीच्या वापरासाठी

आवश्यक मूलभूत सुविधांचे खंडण करु नये म्हणून मनाई देण्यात यावी अशी विनंती केली.

६. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी निशाणी क्र.४९ कडे सदरील अर्जास म्हणणे देऊन त्यांच्या विरुध्द केलेली कथने नाकारली आहेत. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार वादी यांनी सदरील अर्जामध्ये नवीन कारणांच्या आधारे अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे नवीन कारणाबाबत वादींनी नवीन दावा दाखल करणे आवश्यक होते. सदरील दाव्यामध्ये वादींना अशा स्वरुपाची दाद मागण्याचा कोणताही अधिकार नाही. परंतु केवळ कोर्ट फी वाचविण्याच्या हेतूने अशा स्वरुपाचा मनाई अर्ज वादींनी दाखल केला आहे. त्यामुळे सदरील अर्ज चालण्यास पात्र नाही. वादींनी त्यांचे सभासदत्व रद्द करण्यात आलेल्या ठरावास दाखल केलेले अपिल हे दिनांक १०/०६/२०२० रोजी मंजुर झाले. या दरम्यान प्रतिवादी क्र.१ संस्थेच्या वतीने फ्लॅटचा कब्जा हस्तांतरीत करण्यात यावा अशी नोटीस दिली. परंतु अशी नोटीस देण्यापुर्वी प्रतिवादी संस्थेने वादींना दिनांक १८/०४/२०१८ रोजी प्रतिवादी संस्थेचे वकील ॲड.अरुणा सिंग यांच्यामार्फत नोटीस देऊन रक्कम रु.१,२३,८३७/- इतक्या रकमेची मागणी वादींकडून करण्यात आली. परंतु वादींनी ती रक्कम संस्थेला दिली नाही. प्रतिवादी संस्थेने आकारलेल्या बिलानुसार मासिक दैनंदिन देखभाल निधीची एकूण रक्कम रु.६,८१,१६१/- डिसेंबर २०२५ च्या बिलानुसार देय रक्कम आहे. परंतु सदरील

रक्कम देण्याचे वादी हे टाळाटाळ करत आहेत. त्यामुळे प्रतिवादी संस्थेने वादींवर योग्य ती कारवाई केलेली आहे. वादी यांनी रिव्हीजन अर्ज क्र.१२/२०२० बाबत केलेले कथन चुकीचे व बेकायदेशीर आहे. कारण सदरील अर्ज हा फेरचौकशी करिता पुन्हा ठेवण्यात आला आहे. परंतु वादींनी सदरील अर्ज नामंजुर झाल्याबाबत खोटी व लबाडीची कथने केली आहेत. प्रतिवादी संस्थेने त्यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ३०/०३/२०१६, ०३/०९/२०१७ व विशेष सर्व साधारण सभा दिनांक १७/०४/२०१६ व ०७/०५/२०१७ मधील ठराव हे योग्य व कायदेशीर आहेत. सदरील ठराव रद्द करुन मागण्याचा वादींना कोणताही हक्क व अधिकार नाही. सर्व सभांना वादी हे संस्थेचे अध्यक्ष म्हणून स्वत: हजर होते व आहेत. वादींनी प्रतिवादी संस्थेच्या मासिक दैनंदिन देखभाल निधीची रक्कम रु.६,८१,१६१/– आज तागायत संस्थेला आदा केलेली नाही त्यामुळे संस्थेने वादींचे पाणी खंडीत केले आहे. वादी हे प्रतिवादी संस्थेचे मासिक दैनंदिन देखभाल खर्च देण्यास कायदेशीरपणे व उपविधीनुसार देणे लागत आहेत. त्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट पिटीशन क्र.४११६/२०२२, ८०४४/२०२५, ८०४५/२०२५, ८१५५/२०२५ व ८०४६/२०२५ रोजीच्या निर्देशामध्ये स्पष्टपणे नमुद केले आहे की, वादी सारख्या सभासदांचे संस्थेविरुध्द विविध प्रकारचे वाद असले तरी देखील सभासद संस्थेच्या मासिक दैनंदिन देखभाल निधी देणे आवश्यक आहे. परंतु असे असून देखील वादींनी

दैनंदिन देखभाल खर्च दिला नसल्याने संस्थेला पाणी व ड्रेनेज कनेक्शन तोडण्याचा हक्क व अधिकार आहे. कनेक्शन तोडण्यापुर्वी प्रतिवादी संस्थेने वादींना वेळोवेळी पत्र दिलेले आहे. तसेच नोटीस देखील दिलेली आहेत. ते पत्र व नोटीस वादींना प्राप्त झालेले आहेत. प्रतिवादी संस्थेने न्यायालयाच्या कोणत्याही आदेशाचा भंग केलेला नाही. तसेच वादींच्या कब्जेवहिवाटीला हरकत अडथळा देखील निर्माण केलेला नाही. केवळ वादींनी देखभाल खर्च दिला नसल्यामुळे संस्थेने योग्य ती कायदेशीर कारवाई केलेली आहे. वादी हे आजदेखील त्यांच्या सदनिकेचा उपभोग घेत आहेत. संस्थेने वादींच्या सदनिकेचा कब्जा हिरावुन घेतलेला नाही. सदनिका आज देखील वादींच्या ताब्यात कब्जात असून वादी हे सदनिकेचा उपभोग घेत आहेत. वादी हे न्यायालयामध्ये स्वच्छ हाताने आलेले नाहीत. वादींचा अर्ज मंजुर झाल्यास संस्थेकडून वादींना येणारी लाखो रुपयांच्या मासिक दैनंदिन देखभाल निधीच्या पैशाच्या रुपाने भरुन न येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

७. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. सदरील अर्ज निकाली काढणेकरीता खालील मुद्दे विचारात घेण्यात आले.

	मुद्दे	निष्कर्ष
१.	वादी हे सिध्द करतात काय प्रथमदर्शनी केस ही वादी यांच्या बाजुने आहे ?	नकारार्थी...
२.	वादी हे सिध्द करतात काय की, न्यायाचा समतोल वादी यांच्या बाजुने आहे ?	नकारार्थी...
३.	अंतरीम मनाई मिळाली नाही तर वादी यांचे अतोनात नुकसान होणार आहे, हे वादी सिध्द करतात काय ?	नकारार्थी...
४.	काय आदेश ?	अर्ज नामंजूर करण्यात येतो...

मुद्दा क्रमांक १ ते ३ करिता : –

८. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी विधीज्ञांनी युक्तीवादा मध्ये कथन केले की, प्रतिवादी संस्थेच्या जमिनीचे विकसक श्री.समीर नार्वेकर यांनी प्रतिवादी क्र.२ व ३ यांना हाताशी धरुन प्रतिवादी क्र.१ संस्थेमध्ये सन २०१५ सालापासून असंख्य गैरकृती चालविल्या आहेत. त्यांच्या गैरकृत्याच्या विरुध्द वादी यांनी वेळोवेळी दाद मागितल्या आहेत. तसेच त्यांनी वादी संस्थेचे खोटे कागदपत्रे तयार करुन खोटे प्रोसिडींग तयार केले आहेत. तसेच वैयक्तीक व्देषातुन वादींचे सभासदत्व रद्द करुन वादींच्या मालकीच्या फ्लॅटचा कब्जा मिळविण्याच्या इरादयाने गैरकृती चालु केल्या आहेत. परंतु प्रतिवादी क्र.२ व ३ यांचा वादींच्या मालकीच्या फ्लॅटशी कोणताही संबंध नाही. परंतु समीर नार्वेकर यांनी वादींवर दबाव आणण्याचा प्रयत्न चालु केला आहे.

समीर नार्वेकर व प्रतिवादी क्र.१ व २ यांनी संगनमत करुन तसेच बहुमताच्या जोरावर वादींना अध्यक्ष म्हणून डिड ऑफ कनव्हएन्स दस्तावर बळजबरीने सही करण्यास भाग पाडले आहे. तसेच सन २०१६ साला पासून वादींच्या विरुध्द खोटया तक्रारी करण्याचे षडयंत्र रचले आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिल्याचे नाटक करुन प्रतिवादी क्र.१ संस्थेवर अवसायक नेमणुकीचा आदेश करुन घेतलेला आहे. परंतु प्रतिवादींचे हे कृत्य बेकायदेशीर आहे. वादी यांनी त्यांची देय रक्कम भरणा केली आहे. परंतु असे असून देखील प्रतिवादी संस्थेने वादींच्या दावा मिळकतीमध्ये पाणी व ड्रेनेज कनेक्शन तोडले आहे. त्यामुळे वादींच्या मूलभूत सुविधांवर गदा आली आहे. प्रतिवादी संस्थेने पारित केलेले ठराव कायदयाने मंजुर होण्यास पात्र नसतांना देखील मा.सहायक निबंधक, सहकारी संस्था, सावंतवाडी यांना हाताशी धरुन वादींच्या सभासदत्व रद्द केलेल्या ठरावास दिनांक २१/०३/२०१८ रोजीच्या आदेशाने मंजुरी घेण्यात आली आहे. परंतु त्या आदेशा विरुध्द वादी यांनी मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण भवन, मुंबई यांच्याकडे अपिल दाखल केले व ते अपिल दिनांक१०/०६/२०२० रोजी मंजुर करण्यात आले. परंतु असे असून देखील वादींनी फ्लॅटचा कब्जा हस्तांतरीत करावा अशी बेकायदेशीर नोटीस प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी वादींना पाठविली. परंतु वादींनी त्याचे योग्य व समर्पक उत्तर दिले आहे. परंतु असे असून देखील प्रतिवादी संस्थेने वादींचे पाणी कनेक्शन तोडले

आहे. परंतु प्रतिवादी संस्थेला पाणी कनेक्शन तोडण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही.

९. प्रतिवादीच्या विधीज्ञांनी युक्तीवादा मध्ये कथन केले की, वादींनी अर्जामध्ये नमूद केलेल्या कारणाबाबत नवीन दावा दाखल करणे आवश्यक होते परंतु केवळ कोर्ट फी वाचविण्याच्या उद्देशाने वादींनी हयाच दाव्यामध्ये सदरील अर्ज दाखल केला आहे. तो अर्ज चालण्यास पात्र नाही. वादी हे प्रतिवादी संस्थेस डिसेंबर २०२५ च्या बिलानुसार रक्कम रु.६,८१,१६१/- एवढी रक्कम देणे लागत आहेत. परंतु वादींनी सदरील रक्कम देण्याचे टाळाटाळ केल्यामुळे संस्थेने वादींविरुध्द योग्य ती कार्यवाही केलेली आहे. आज देखील दावा मिळकत ही वादींच्या ताब्यात असून वादी हे दावा मिळकतीचे उपभोग घेत आहेत. केवळ वादींनी देय रक्कम भरणा केली नसल्यामुळे प्रतिवादी संस्थेने वादींचे पाणी खंडीत केले आहे. परंतु पाणी खंडीत करण्यापुर्वी संस्थेने वादींना योग्य ते पत्र तसेच स्मरणपत्र तसेच नोटीस तसेच उपनिबंधक, सहकारी संस्था, सिंधुदुर्ग यांनी केलेला आदेश इत्यांदी माहिती वादींना होती व आहे. त्यामुळे वादींना अशा स्वरुपाचा अर्ज करण्याचा कोणताही अधिकार नाही.

१०. वादी व प्रतिवादीच्या विधीज्ञांच्या युक्तीवादावरुन तसेच दाखल कागदपत्रांवरुन असे लक्षात येते की, वादी हे प्रतिवादी क्र.१ संस्थेचे सुरुवातीपासून

सभासद होते त्यानंतर त्यांची अध्यक्ष म्हणून नेमणुक करण्यात आली होती. वादी हे प्रतिवादी संस्थेचे सभासद होते ही बाब दोन्ही बाजुना मान्य व कबुल आहे. वादींच्या म्हणण्यानुसार त्यांनी प्रतिवादी संस्थेची देय रक्कम रु.१५,०५०/– ही मा.सहायक निबंधक, सहकारी संस्था, सावंतवाडी यांनी केलेल्या आदेशानुसार प्रतिवादी संस्थेकडे भरणा केलेली आहे. याउलट प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार डिसेंबर २०२५ च्या बिलानुसार वादी कडून प्रतिवादी संस्थेला रक्कम रु.६,८१,१६१/– इतकी रक्कम येणे आहे. प्रतिवादींनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन देखील वादींकडून प्रतिवादी संस्थेला रक्कम रु.६,८१,१६१/– एवढी रक्कम येणे आहे. याचाच अर्थ वादी हे कसुरदार (defaulter) आहेत. वादींनी प्रतिवादी संस्थेच्या कोणत्याही अटी व शर्तींचे पालन केलेले नाही. तसेच स्वत: कसुरदार असून देखील त्यांनी सदरील अर्ज दाखल केला आहे. याचा अर्थ वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयामध्ये आलेले नाहीत. त्यामुळे जी व्यक्ती स्वच्छ हाताने न्यायालयामध्ये येत नाही त्या व्यक्तीस कोणतीही दाद मागण्याचा अधिकार नाही. तसेच वादींच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी संस्थेने वादींचे पाणी कनेक्शन व ड्रेनेज कनेक्शन तोडले आहे. सदरील बाब प्रतिवादी संस्थेने मान्य करीत केवळ वादींना त्यांनी अनेक वेळा कळवुन देखील त्यांनी देय रकमेचा भरणा केला नसल्यामुळे कनेक्शन तोडल्याचे मान्य केले आहे. परंतु फ्लॅट मिळकत ही आज देखील ताब्यात असून वादी हे मिळकतीचा उपभोग घेत आहे. त्यामुळे अशा

परिस्थितीमध्ये प्रथम दर्शनी केस ही वादींच्या बाजुने आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते. तसेच वादी हे न्यायालयामध्ये स्वच्छ हाताने आले नसल्यामुळे त्यांना कोणतीही दाद मागण्याचा अधिकार नाही. त्यामुळे न्यायाचा समतोल देखील वादींच्या बाजुने नाही. तसेच अंतरीम मनाई दिली नाही तर वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे मुद्दा क्र.२ व ३ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

११. **<u>मुद्दा क्रमांक ४ : –</u>**

वरील सर्व कारणांचा विचार करता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

<u>आदेश</u>

१.	निशाणी ४५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.
	(खुल्या न्यायालयामध्ये जाहिर.)

Digitally signed by AARTEE ARUN PUND
Date: 2026.06.24 11:44:10 +0530

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : २४/०६/२०२६

(श्रीमती ए. ए. पुंड)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय क्र.२ कोल्हापूर

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

Name of Stenographer	:	Smt. Sanjivani S. Ghatge L.G. Stenographer.
Court Name.	:	Judge, Co-operative Court No.2 Kolhapur
Date	:	24/06/2026
Judgment signed by presiding officer on	:	24/06/2026
Judgment uploaded on	:	24/06/2026.